केंद्र पुरस्कृत स्वजलधारा योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर स्थापन केलेल्या **स्वजलधारा कक्षाकरिता लेखाधिकारी (वर्ग-२) संवर्गाचे पद निर्माण** करणाबाबत.

३५८७/५

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापापु १००६/प्रक्र-४४२/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक २ जानेवारी २००७**

**वाचा :** शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि.,क्रमांक ग्रापापु १००६/प्रक्र.३७४/पापु-०७, दिनांक १७ ऑक्टोबर, २००६

**शासन निर्णयः**

राज्यस्तरावर स्वजलधारा कक्ष निर्माण करण्यास व त्यासाठी ७ पदे निर्माण करण्यास संदर्भीय दिनांक १७ ऑक्टोबर, २००६ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. या कक्षासाठी व संवाद व क्षमता विकास कक्षासाठी केंद्र शासनाकडून मोठया प्रमाणात निधी प्राप्त होत आहे. केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीचे खर्चावर नियंत्रण ठेवणे, लेखे ठेवणे यासाठी स्वजलधारा कक्षात लेखाधिकरी (वर्ग-२) पदाची आवश्यकता असल्याने, राज्यस्तरावरील स्वजलधारा कक्षासाठी **लेखाधिकारी (वर्ग-२)** संवर्गाचे एक पद निर्माण करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. सदर पद महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील अथवा संचालक, लेखा व कोषागरे यांच्या कडील लेखाधिकारी (वर्ग-२) संवर्गातील योग्य अशा अधिका-याच्या प्रतिनियुक्ती द्वारे भरण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

३. सदर पद स्वजलधारा योजनेची अंमलबजावणी जोपर्यंत केंद्र शासनाकडून सुरु आहे व प्रशासकीय खर्चासाठी केंद्र शासन निधी उपलब्ध करुन देत आहे तो पर्यंत अस्तित्वात राहील.

४. स्वजलधारा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यास दरवर्षी IEC/HRD व प्रशासकीय खर्चासाठी केंद्र शासनाकडून राज्यास प्राप्त होणा-या तरतूदीमधून या पदाच्या वेतन व भत्यावरील खर्च भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००७०१०२१७०३०६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

संजीव कुमार
**(संजीव कुमार)** २/१
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

\\Hp29732583912-w\d\NEWFOL~1\swaldhara cell formaton GR- CR- 374.coc

प्रति,

मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. अध्यक्ष , जिल्हा परिषद, (सर्व)
मा. मुख्य सचिव
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
प्रकल्प व्यवस्थापक, जलस्वराज्य प्रकल्प, सुधारणा सहाय व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, बेलापूर
प्रकल्प अधिकारी, आपलं पाणी प्रकल्प, सुधारणा सहाय व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, बेलापूर
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
तहसीलदार (सर्व)
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद, (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग
संगणक कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग